**नियमित फौजदारी खटला क्र. ७५/२०१९**

**निशाणी ६५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ३  यांचा जबाब शपथेवर सुरू**

**माझे नांव** – अंजुम अकबर मुलाणी

**वय** – ४४ **वर्षे,** **व्यवसाय** – केमिस्ट.

**रा.** – इस्लामपूर, **ता.** वाळवा, **जि.** सांगली.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे श्री एस. बी. जाधव सहा. सरकारी अभियोक्ता यांचेतर्फे**

सन २०१८ मध्ये मी इस्लामपूर येथे रहात होतो. 'प्रकृती आयुर्वेदीक चिकित्सालय' या दवाखान्यासमोर माझे 'साईदत्त मेडीकल' या नावाने औषधी दुकान आहे. सदर दुकान मी स्वतः चालवितो. दिनांक २५/११/२०१८ रोजी संध्याकाळी ७:१५ ते ७:३० चे सुमारास माझे दुकानासमोरील बाकड्यावर बसलो होतो. त्यावेळी माझ्यासोबत राजेंद्र पाटील व अवधुत शेटे होते. त्यावेळी डॉक्टर रणजित पाटील यांचे केबीनमध्ये कसलीतरी हालचाल होताना दिसली. त्यानंतर मी, राजेंद्र पाटील व अवधुत शेटे केबीनकडे गेलो. त्यावेळी एक माणूस केबीनमधून बाहेर आला. त्या व्यक्तीच्या हातात एक स्क्रू ड्रायव्हर व एक रुमाल बांधलेल्या टाईपमध्ये होता. मला शंका आल्यामुळे केबीनमध्ये जावून पाहिले असता ड्रॉवर उघडलेला दिसले. त्याठिकाणी खाली थोडेफार पैसे पडलेले दिसले. त्यावेळी त्या माणसाने चोरी केल्याची शंका आली म्हणून त्याला आम्ही पकडले. त्यानंतर लगेच पोलिस ठाण्यात फोन केला. त्यानंतर पोलिस आले व त्या माणसाला पकडून नेले. चोरी गेलेली रक्कम रुपये ३०२०/– होती. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपीचे नाव रोहित आकळे असे आहे. रोहित आकळे सोबत एक माणूस होता. त्या माणसाचे नाव संतोष माने असल्याचे रोहित आकळे यांनी सांगितले होते. आम्ही त्या माणसाला पकडत असताना तो झटापटीत पळून गेला. आज

आरोपी न्यायदालनात हजर नाहीत. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता.

**<u>उलटतपासणी आरोपीतर्फे श्री. एस. एम. नवाळे विधीज्ञ.</u>**

स्क्रू ड्रायव्हरने ड्रॉवर काढताना आरोपीला मी प्रत्यक्ष पाहिलेले नाही. डॉक्टरच्या ड्रॉवरमध्ये किती रक्कम होती हे मला सांगता येत नाही. रुमालात काय बांधले होते हे मला सांगता येत नाही, हे म्हणणे खोटे आहे. रोहित आकळे याला घटनेपूर्वी मी पाहिले नव्हते. संध्याकाळी ७:१५ ते ७:३० चे सुमारास मी माझे दुकानासमोरील बाकड्यावर बसल्याचे खोटे सांगत आहे, हे म्हणणे खोटे आहे. सरतपासणी दरम्यान घटनेबाबत मी जे काही सांगितले आहे ते खोटे आहे, हे म्हणणे खोटे आहे. फिर्यादीला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खोटे आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN

Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.02.23 18:57:35 +0530

**(भगवान म. कारलेकर)**

**इस्लामपूर.**

**दिनांकः– २३/०२/२०२६**

**अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, इस्लामपूर.**